MHAU030038452024

**कौ.हिं.म.सं.का. अर्ज क्र.८२/२०२४**
**अक्षदा सोनवणे**
**विरुध्द**
**योगेश सोनवणे व इतर**

**<u>कौ.हिं.म.सं.का. अर्ज क्र.८२/२०२४ मधील निशाणी ०५ खालील आदेश</u>**

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**अर्जदार हिच्या प्रस्तुत अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे,**

०२. अर्जदार व गैरअर्जदार क्र १ यांचा विवाह दि.११.०६.२०१५ रोजी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे झालेला आहे. सदर लग्नसंबधातुन अर्जदाराला गैरअर्जदार क्र. १ पासुन एक अपत्य आहे. लग्नात अर्जदारच्या वडीलांनी लग्नामध्ये रुपये ९,५०,०००/- एवढा खर्च लागलेला आहे. साखरपुडयाचा खर्च रक्कम रुपये १,५०,०००/- असे एकुण रक्कम रुपये ११,००,०००/- खर्च झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारच्या घरी नांदण्यास गेल्यानंतर तिच्या लक्षात आले की, गैरअर्जदार क्र. १ हा नेहमी डीप्रेशनमध्ये राहतो. तो सतत चिडचिड करत असे. तसेच पोर्नोग्राफी मोबाईलवर पाहण्याचे त्याला व्यसन होते. दिनांक ०४.०९.२०१७ रोजी तिला मुलगी झाली. गैरअर्जदार यांना मुलगी नको होती म्हणुन ते तिचा तिटकारा करु लागले. गैरअर्जदार हे अर्जदारास मारहाण करुन शिवीगाळ करत होते. मे २०१९ मध्ये गोलेवाडी येथे आज्ञीसासु यांच्याकडे गैरअर्जदार यांचे कुटुंब तसेच अर्जदार यांचे आईवडील मामा व मध्यस्थ यांच्यामध्ये बैठक बोलावली होती. गैरअर्जदार क्र. १ बैठक उधळुन लावत होता व अर्जदाराच्या वडीलांचा व नातेवाईकांचा अपमान करत होता तरीदेखील गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी चुकी मान्य केल्यामुळे अर्जदार परत नांदण्यासाठी गैरअर्जदाराकडे आली. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार हिला सतत शारिरीक व मानसिक छळ चालुच ठेवला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ यांनी मला हे लग्न नको

आहे व घटस्पोट हवा असे म्हणुन तिला नांदवण्यास नकार दिला.

०३. अर्जदार ही तिच्या माहेरी राहते. तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार क्र.१ हा शेती करत असुन त्यातुन त्याला २५,००,०००/- वार्षिक उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे एकुण १८ एकर शेती आहे. त्यामुळे अर्जदारास दरमहा ४५,०००/- पोटगी मिळावी व घरभाडयासाठी १५,०००/- मिळावे तसेच औषधोपाचारासाठी ५,०००/- मिळावे अशी विनंती केली आहे. सबब अंतरिम पोटगी मंजुर करण्याची विनंती केली.

०४. गैरअर्जदार यांनी ई-फायलिंगद्वारे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला. गैरअर्जदार यांचे म्हणण्यानुसार प्रस्तुतचा अर्ज व त्यामधील कथने खोटी व चुकीची आहेत. गैरअर्जदार कथन करतात की, वास्तविक लग्नाचा सर्व खर्च गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी उसनवार रक्कम उभी करुन केलेला आहे. लग्न साध्या पध्दतीने झाले होते. अर्जदार हीचे संसारात कधीही मन रमले नाही. अर्जदारास तिच्या माहेरच्या नातेवाईकांनी फुस लावुन गैरअर्जदारासोबत ती वाद घालत असे. ती नेहमी म्हणत असे की, मी तुमच्याबरोबर नांदणार नाही, माहेरी जाऊन राहीन, नवरा काळा आहे, लग्न इच्छेविरुध्द झाले आहे. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ यास पती म्हणुन कधीही योग्य प्रकारे वागवले नाही. गैरअर्जदार क्र. १ हा साधाभोळा असुन अर्जदारापेक्षा कमी शिकलेला आहे. त्यामुळे तिने नांदण्यास नकार दिला आहे. मुलगी झाल्यानंतर गैरअर्जदार यांना खुप आनंद झाला. मुलीला पाहण्याकरिता ते अर्जदाराच्या माहेरी गेले असता त्यांना घरात येऊ दिले नाही. अर्जदार ही कोणतेही काम करत नसे. जेवण झाल्यानंतर ताबडतोब रुममध्ये निघुन जात व बाळाकडे कोणालाही येऊ देत नसे. अर्जदार ही कारण नसतांना माहेरी राहते व सध्या नोकरी करत आहे. अर्जदार हीला दरमहा ३०,०००/- रुपये पगार आहे. गैरअर्जदाराचे एटीएम कार्ड अर्जदार घेऊन गेली आहे. अर्जदाराने नांदण्यास यावे याकरिता अर्जदाराला नोटीस पाठवलेली आहे. सदर नोटीस पाठवुनदेखील ती नांदण्यास आली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०५. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले.

अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. गैरअर्जदार याने त्याचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र ई-फायलींगद्वारे दाखल केलेले नाही. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचे कामी कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केलेली आहे. सबब अर्जदार हिचे मागणीचा विचार करता प्रथमतः गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचे बाबत कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे ही बाब अर्जदार हिला प्रथमदर्शनी शाबित करणे गरजेचे आहे.

०६. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कथनांचा विचार करता अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी असल्याबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद नाही. गैरअर्जदार क्र. १ हा शेतकरी असुन त्याला दरमहा उत्पन्न मिळते. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ याने तिला नांदविण्यासाठी कधीही प्रयत्न केले नाहीत.

०७. अर्जदार क्र.१ हिच्या कथनांनुसार गैरअर्जदार यांनी वेळोवेळी तिचेबाबत कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. अर्जदार क्र.१ हिने तिचेबाबत घडलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना या अर्जाला शपथपत्र दाखल करुन शपथेवर सांगितलेल्या आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे सध्या स्वतंत्र राहत आहेत याबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद नाही. कलम २३ अन्वये अर्ज पाहत असताना प्रथमदर्शनी अर्जदार हिचेबाबत कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे का, हे पाहणे गरजेचे आहे. वर कथन केल्याप्रमाणे अर्जदार हिने तिचेबाबत घडलेल्या हिंसाचाराच्या घटना या शपथपत्राद्वारे शपथेवर सांगितलेल्या आहेत. याउलट अर्जदार हिचेबाबत कौटुंबिक हिंसाचार झालेला नाही हे दर्शविणारा कोणताही तोंडी अगर कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचेबाबत गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदवणे न्यायोचित दिसुन येते.

०८. वर कथन केल्याप्रमाणे अर्जदार हिने तिचेबाबत गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे ही बाब प्रथमदर्शनी शाबीत केलेली आहे. त्यामुळे अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ याचेकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय हे पाहणे गरजेचे आहे.

०९. अर्जदार हिने तिचे अर्जामध्ये तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही असे कथन केलेले आहे. अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल करुन तिला दरमहा रक्कम रु. १०,०००/- इतका एकुण खर्च येतो, असे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्रात गैरअर्जदार क्र.१ याला दरमहा रक्कम रु.२५,००,००० वार्षिक उत्पन्न मिळत असल्याचे कथन केलेले आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या नावावर असणा-या शेतजमिनीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. परंतु, गैरअर्जदार याला वार्षिक २५,००,०००/- रुपये उत्पन्न मिळते हे दाखवणारा पुरावा दाखल केलेला नाही. सदर गैरअर्जदार क्र. १ हा शेतकरी असुन त्याच्या नावे शेतजमीन आहे. तो धडधाकट असुन शेतीतुन उत्पन्न कमावतो हे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१०. गैरअर्जदार क्र.१ याने ई-फायलींगद्वारे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ यास वार्षिक उत्पन्न मिळते असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

११. गैरअर्जदार याने असे कथन केले आहे की, अर्जदार ही नोकरी करते व तिला दरमहा ३०,०००/- रुपये पगार मिळतो. परंतु, ती नोकरी करत असल्याबाबतचा पुरावा दाखल केलेला नाही. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार हिला सध्या उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, असे प्रथमदर्शनी अभिलेखावरुन दिसुन येत आहे.

१२. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी आहे ही बाब गैरअर्जदार क्र. १ याने नाकारलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिची पत्नी म्हणुन योग्यप्रकारे सांभाळ करण्याची व त्यांचा उदरनिर्वाहाची योग्य ती सोय करण्याची संपुर्ण जबाबदारी ही गैरअर्जदार क्र.१ याचेवर आहे. सदरची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ हा नाकारु शकत नाही. वर कथन केल्याप्रमाणे अर्जदार ही सध्या कोणताही कामधंदा करीत नाही असे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच गैरअर्जदार याने कथन केल्याप्रमाणे त्याच्यावर त्याच्या आई-वडीलांची जबाबदारी असल्याची व त्याला खर्च येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाचा व त्याचे खर्चाचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ याचेकडुन अर्जदार हिला अंतरिम पोटगी म्हणुन रक्कम रु.८,०००/- इतकी पोटगी मंजुर करणे न्यायोचित दिसुन येते.

१३. सबब, वर नोंदविलेल्या निरीक्षणांवरुन व निष्कर्षांवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ०५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल झालेल्या दिनांकापासुन प्रस्तुतचा मुळ अर्ज निकाली होईपर्यंत दरमहा रक्कम रुपये ८,०००/- इतकी अंतरिम पोटगी द्यावी, असा गैरअर्जदार क्र.१ यास आदेश करण्यात येतो.

३. सदर आदेशाची एक प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

४. सदर आदेशाची एक प्रत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी यांना पाठविण्यात यावी. तसेच आदेशाची एक प्रत संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2026.04.15 12:16:43 +0530

**दिनांक – १५.०४.२०२६**
**ठिकाण - औरंगाबाद**

**(स्नेहल एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.१३) औरंगाबाद.**